N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** कोल्हापूरी गेट
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0317 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/12/2025 19:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 19/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/11/2025
**Time From (वेळेपासून):** 17:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/12/2025 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/12/2025 19:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पार्वती नगर अमरावतीमहात्मा फुले कॉलेज जवळ अमरावत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगिता जनार्दन ठाकरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमराव,फ्रेजरपूरा,अमरावती शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमराव,फ्रेजरपूरा,अमरावती शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7743880650

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शशीकांत मनोहरराव मेश्राम | | | 1. कवठा बहाळे ताभातकुली , भातकूली ,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरेंद्र अजाबराव कुरवाडे | | | 1. नायरा पेट्रोल पंपाजवळ,कठोरा नाका अमरावती,गाडगे नगर, अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | प्रल्हाद नामदेवराव तेलंग | | | 1. जिजाउ कलनी,अर्जुन नगर अमरावती,गाडगे नगर,अमरावती |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | शहर,महाराष्ट्र,भारत |
| 4 | चंदन बाबुरावजी नागमोते | | | 1. पावर्ती नगर न1 अमरावती, कोल्हापूरी गेट,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे)**:**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील)**:**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत )**:**

फिर्याद ला.प्र.वि.अमरावती दि.03/12/2025 सरतर्फे:- श्रीमती योगिता जनार्दन ठाकरे वय 38 वर्ष नोकरी पद पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती, मो.क्र.- 7743880650मी आज रोजी समक्ष ला.प्र.वि कार्यलय अमरावती येथे सरतर्फे फिर्याद देते की,मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती या ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दिनांक 27/10/2025 रोजी मी ला.प्र.वि अमरावती येथे कार्यलयात हजर असताना तक्रारदार सुमेध सुखदेवराव खांडेकर वय 45 वर्ष व्यवसाय ग्रामरोजगार सेवक कवठा बहाळे ता.भातकुली जि.अमरावती यांनी तक्रार दिली की, ते ग्रामपंचायत कवठा बहाळे येथे 10/04/2023 पासुन रोजगार सेवक या पदावर काम करीत आहेत. तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे मानधन 1,62,500/- रूपये पंचायत समिती भातकुली कडुन मंजुर करण्यात येवुन ग्रामपंचायत कवठा बहाळे यांच्याकडे सदर रक्कम वर्ग करण्यात आली आहे. याबाबत तक्रारदार यांना माहिती होती. करीता तक्रारदार यांनी त्यांच्या मानधनच्या चेकची मागणी ग्रामपंचायतच्या मासिक मिटिंग दरम्यान (निष्चीत तारीख आठवत नाही) ग्रामपंचायत सचिव सुरेंद्र कुरवाडे व सरपंच सौ.किरणताई मेश्राम यांना केली असता सौ.किरणताई मेश्राम यांनी सदर मानधनाचा चेक देण्यासाठी 50 हजार रूपयाची मागणी केली व ग्रामसेवक यांनी त्यास दुजोरा दिला. किरणताई मेश्राम यांनी तक्रारदार यांना म्हटले की, सदरच्या रूपयाबाबत तुम्ही माझे पती शशीकांत मेश्राम यांच्याषी बोलुन त्यांच्या जवळ 50 हजार रूपये दया. त्यांनी सांगितल्यावर मी तुमचा 1,62,500/- रूपयाचा चेक माझे पती षषिकांत मेश्राम यांच्याकडे देईल. सदर चेक बाबत तुम्हाला मला भेटण्याची आवष्यकता नाही असे तक्र्रारदार यांना सरपंच सौ.किरणताई मेश्राम यांनी म्हटले. तरी मला सरपंच किरणताई मेश्राम यांचा पती शषिकांत मेश्राम व ग्रामसेवक सुरेंद्र कुरवाडे यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तरी त्यांचेवर कायदेषिर कारवाई व्हावी अशी तक्रार प्राप्त झाली.त्यावरून आम्ही तात्काळ मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम आदिवासी विभाग अमरावती यांना पत्र देवुन 1) श्री.सुधिर गुलाबराव खेडकर वय 55 वर्ष पद वरिश्ठ लिपीक 2) श्री.प्रदिप आनंदराव गोळे वय 56 वर्ष पद वरिष्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच बोलविले. सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हा व पंचासमक्ष वरीलप्रमाणे हकीकत पुन्हा सांगीतली व कागदावर लिहुन तशी लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री.खेडकर यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली व त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करुन पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला व लागलीच पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ पो.कॉ.जांभोळे यांनी व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.खेडकर यांचेसह सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकात मेश्राम व ग्रामसेवक श्री.



Scanned with OKEN Scanner

सुरेंद्र कुरवाडे यांची भेट घेणेकामी पंचायत समिती कार्यालय,भातकुली येथे रवाना केले. त्यावेळी तेव्हा तक्रारदार श्री. खांडेकर व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे तसेच विस्तार अधिकारी श्री.तेलंग यांची भेट झाली. परंतु, श्री.शशीकांत मेश्राम यांची भेट झाली नाही. त्यानंतर थोडयाच वेळात ते परत आले.
त्यानंतर आम्ही, तक्रारदार व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे तसेच विस्तार अधिकारी श्री.तेलंग यांच्यातील संभाशणाची क्लिप ऐकली असता त्यात तक्रारदार व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे तसेच विस्तार अधिकारी श्री. प्रल्हाद तेलंग यांच्यात चेकबाबत बोलनी झाली. त्यावेळी तक्रारदार बोलले की, '' कस करता सांगना कुरवाडे साहेब...'' त्यावर कुरवाडे बोलले की,'' आता तुम्ही म्हणता राजेहो गावात सांगतल नाही.... तो म्हणते सांगीतल... तीस हजार रुपयात सेटलमेंट झालत.'' त्यावर तक्रारदार बोलले की, '' हे काही मी कोणाले सांगीतल नाही... म्या कोणालेच नाही सांगीतल...त्यावर ग्रामसेवक श्री.कुरवाडे बोलले की, '' सही कराच काम होत... घरी चेक नेउन दिल्यावर... संध्याकाळी सही करतो म्हणे मग अचानक काय झाल..'' त्यानंतर तक्रारदार बोलले की, अव मले पैशाच काम आहे ना अर्जेंट...म्हणून तर होय नाही त मी कायले हे करतो...'' त्यावर ग्रामसेवक कुरवाडे बोलले की,'' तुम्हाले जर अर्जंट पैशाच काम असत राजेहो... पहिलेच पैसे देवून देल्ले असते आज एवढा दांगडो झाला नसता पुर्ण जिल्हयात...'' असे म्हटले. त्यावर त्यावर तक्रारदार बोलले की, '' अरे पण... तेलंग साहेबाले मदात होते म्हणून म्या हो तरी म्हटल... हाय कानी नाही म्हटल काय म्या..'' त्यावर विस्तार अधिकारी श्री.तेलंग यांनी तक्रारदार यांना म्हटले की,'' हो ना मग... काउन तुम्हाले म्या हो म्हनाले लावल...सिचवेशनच तसी होती..'' त्यावर ग्रामसेवक श्री. कुरवाडे तक्रारदार यांना बोलले की, '' तर अर्जेंट काम होत तर पैसे देवून मोकळा विशय कराचा होता आता पर्यंत... निल झाल असत... कागदाले कागद लागल्यावर... मग कठिण आहे ना मग...काहीच नाही होत...पैसे काय...मी काय म्हणतो तुम्ही तीस खिशात घेवून या...त्या हाती चेक घेवून येवू..'' असे म्हटले असता त्यावर श्री.तेलंग साहेब यांनी तक्रारदार यांना'' नाही तर एक काम करन साले कुठूनही पैसे काढन...हे घे म्हणा पैसे चल सही कर म्हणा झाल...देणेच आहे ना पैसे आपल्याला..'' असे म्हटले. त्यावर श्री.कुरवाडे यांनी तक्रारदार यांना म्हटले की,'' तेच्या पेक्षा तेच्या हातात... मला सांगा करण आहे ना...हे पैसे घे बा चेक वर सही मार..'' लावा एक दोन दिवसात फिल्डींग...'' असे म्हटले. त्यानंतर तक्रारदार हे पंचासोबत तेथुन निघुन परत आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांनी तक्रारदार यांनी ग्रामरोजगार सेवक म्हणून केलेल्या कामाचे मानधन एकुन 1,62,500/- रु. च्या चेकवर सरपंच यांची सही आणून देण्यासाठी तडजोडीअंती 30,000/-रु. लाचेची मागणी करून पैसे देण्यास प्रोत्साहन दिले तसेच विस्तार अधिकारी श्री.तेलंग यांनी तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर ग्रामसेवक यांनी 'लावा एक दोन दिवसात फिल्डींग' असे म्हटल्याने ग्रामसेवक श्री.कुरवाडे यांचा तक्रारदार यांना परत फोन आल्यानंतर त्यांची भेट घेवून सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आलेत्यानंतर तक्रारदार यांनी दि.10/11/2025 रोजी आम्हाला फोन करुन माहिती दिली होती की, ''सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांची भेट होत नाही. तसेच ते फोन सुध्दा उचलत नाही. त्यामुळे त्यांची भेट होवू शकत नाही. परंतु, ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे हे पैसे स्विकारु शकतात व तेच मला चेकवर सही आणुन देतील असे सांगीतले.'' त्यामुळे ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांचेवर दि.11/11/2025 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आलेत्यावरून आम्ही मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम आदिवासी विभाग अमरावती यांना पत्र देवुन पुर्वी तात्पुरते परत केलेले पंच बोलावले असता त्यांनी 1. श्री.राजु हिरामण धारकर, वय 55 वर्ष, पद- वरिश्ठ लिपीक 2.श्री.प्रदिप आनंदराव गोळे वय 56 वर्श पद वरिश्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच पाठविले. त्यानंतर आम्ही दि.11/11/2025 रोजी ग्रामसेवक श्री.कुरवाडे यांचेवर सापळा कारवाई करायची असल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम 30,000/-रू हजर करण्यास सांगीतले असता त्यांनी 8,000/-रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 16 नोटा हजर केल्या व उर्वरीत रक्कम खेळण्यातील नकली 44 नोटा वापरण्याचे ठरले. त्यानंतर नोटांचे क्रमांक आम्ही पंच क्र.1 श्री. गोळे यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री.धारकर यांना को-या कागदावर क्रमांक लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व आम्ही सहया केल्या. त्यानंतर आमच्या सुचनेवरून स्टाफ उपेंद्र थोरात यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटाला अॅन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच तक्रारदार व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर सापळा पंचनाम्या दरम्यान हजर केलेल्या लाच रक्कमेला अॅथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम तक्रारदार यांच्या पॅटच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली. व पोकॉ.आषिश जांभोळे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून तक्रारदार यांना पंच क्र.1 श्री.गोळे यांचेसह ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांची भेट घेणेकामी पंचायत समिती कार्यलिय,भातकुली येथे रवाना केले. त्यानंतर आम्ही व सापळा पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी हे वेगवेगळ्या वाहनाने पंचायत समिती कार्यालय,भातकुली कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. तेव्हा तक्रारदार व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांची कायलियाचे बाहेरच भेट झाली. त्यावेळी ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांनी



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांना म्हटले की,''सरपंच माझे फोन उचलत नाही आहे. ग्रामपंचायतला गेल्यावर पाहू' परंतु पैसे स्विकारले नाही. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.गोळे हे लाप्रवि कार्यालयात परत आले. त्यानंतर तक्रारदार यांनी सर्वासमक्ष सांगीतले की, 'ग्रामसेवक श्री.कुरवाडे यांचे सरपंच यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांचेसोबत बोलणे झाल्यानंतर काही दिवसांनी ग्रामसेवक श्री.कुरवाडे पैसे स्विकारु शकतात. त्यामुळे ज्यावेळी ग्रामसेवक श्री.कुरवाडे हे तक्रारदार यांना फोन करतील. त्यावेळी पुन्हा एकदा सापळा कार्यवाही आजमावण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.त्यानंतर दि.19/11/2025 रोजी तक्रारदार श्री.खांडेकर यांनी ला.प्र.वि.कार्यालय अमरावती येथे येउन आम्हाला सांगीतले की, ''मी आज रोजी माझे गावाच्या रोडने जात असतांना सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम व त्यांचा मित्र कॉन्ट्रक्टर श्री.नागमोते हे त्यांचे गाडीने जात असतांना मला भेटले व श्री.शशीकांत मेश्राम यांनी मला म्हटले की,'' त्यांना सध्या पैशाची आवष्यकता आहे, त्यामुळे तुम्ही मला आज रोजी 50 हजार दे, मी चेकवर सही करुन चेक तुम्हाला देतो'' त्यामुळे सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांची पडताळणी झालेली नसल्याने सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांचेवर दि. 19/11/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावरून आम्ही तात्काळ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम आदिवासी विभाग अमरावती यांना पत्र देवुन पुर्वी तात्पुरते परत केलेले पंच बोलावले असता त्यांनी 1.श्री.सुधिर गुलाबराव खेडकर वय 55 वर्ष पद वरिष्ठ लिपीक 2.श्री.प्रदिप आनंदराव जोळे वय 56 वर्श पद वरिष्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच पाठविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांचे घर हे पार्वती नगर, बडनेरा रोड,अमरावती येथे असल्याने ते त्यांना त्याच भागात कोठेतरी भेटण्यास बोलवु शकतात असे सांगीतले. त्यामुळे लागलीच पार्वती नगर,बडनेरा रोड,अमरावती येथे जाउन पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही पडताळणी कार्यवाही करण्याकरीता तक्रारदार श्री.खांडेकर यांना पंच क्र.1 श्री.खेडकर यांचेसह आमचे सरकारी गाडीच्या मागेमागे तक्रारदार यांचे दुचाकीने येण्यास सांगीतले.त्यानुसार आम्ही पथक पो.नि. योगीता ठाकरे,पंच क्र.2 तसेच,पोंकॉ.जांभोळे, पोकॉ वैभव जायले असे वाहन चालक पोउपनि श्री.किटुकले शासकिय वाहन क्र. एमएच 12 आरके 5512 ने रवाना होवून दिल्ली पब्लीक स्कुलच्या पुढे थोडया अंतरावर रिकाम्या जागेत जावून थांबलो. त्यानंतर तेथे तक्रारदार श्री.खांडेकर पंच क्र.1 श्री.खेडकर यांचेसह पोहचले. त्यानंतर तक्रारदार श्री.खांडेकर यांनी कॉन्ट्रक्टर श्री. चंदन नागमोते यांना फोन करून भेटण्यास कुठे यायचं याबददल विचारले असता त्यांनी की,महात्मा फुले कॉलेजच्या थोडं पुढे या असे म्हटल्याने लागलीच पोकॉ.आशिष जांभोळे यांनी व्ह यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन पंच क्रं. 1 श्री.खेडकर यांचेसह सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम व ग्रामसेवक कुरवाडे यांना लाच रक्कम देण्याकरीता महात्मा फुले कॉलेजकडे रवाना केले. व त्यांचे मागेच सर्व सापळा पथक कोणालाही शंका येणार नाही या पदधतीने आजुबाजूने जावून थांबले. त्यावेळी सरपंच यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम हे तेथे हजर नव्हते. परंतु, ग्रामसेवक श्री. कुरवाडे व कॉन्ट्रक्टर श्री.नागमोते हे तेथे हजर होते. त्यानंतर ग्रामसेवक श्री.कुरवाडे हे निघून गेले व कॉन्ट्रक्टर श्री. नागमोते यांनी तक्रारदार यांना म्हटले की, सरपंच यांचे पती श्री.मेश्राम यांनी चेक माझेकडे दिला असे म्हटले. परंतु तक्रारदार यांचेकडे पैसे न देता 'तेयले बोलावण' असे म्हणून पैसे दिले नाही. त्यानंतर ते तिथून निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी सर्वासमक्ष सांगीतले की, ''सरपंच यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम हे पैसे घेतल्याशिवाय मला माझा चेक देणार नाही. त्यामुळे ते पुन्हा पैशाची मागणी करु षकतात'' त्यामुळे ज्यावेळी तक्रारदार यांना पुन्हा पैशासाठी फोन येईल किंवा बोलावणे येईल. त्यावेळी पुन्हा सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर आजपावेतो तक्रारदार यांना सरपंच यांचे पती श्री.षषीकांत मेश्राम तसेच ग्रामसेवक श्री.कुरवाडे यांचा पैशासाठी कोणताही फोन आला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांना फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. तसेच तक्रारदार यांचे गावातील एका व्यक्तीचे मयत मध्ये तक्रारदार यांची श्री.शशीकांत मेश्राम व कॉन्ट्रक्टर श्री.नागमोते यांची भेट झाली. त्यावेळी श्री.शशीकांत मेश्राम यांनी तक्रारदार यांना म्हटले की, ' तु आम्हाला पकडायसाठी अँन्टी करप्षनची टीम आणली होती. आम्हाला दिसली. त्यामुळे तु आता काही केले तरी तुला चेक देत नाही.' यावरुन त्यांना तक्रारदार यांचेवर संषय आल्याने ते आता त्यांचेजवळून लाच रक्कम स्विकारणार नाही याची तक्रारदार यांना खात्री झाली आहे. तरी त्यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे ग्राम कवठा बहाळे येथील सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम, ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे, विस्तार अधिकारी श्री.तेलंग व कॉन्ट्रक्टर श्री. नागमोते यांचेविरूद्ध पुढील कार्यवाही करण्यात यावी असे त्यांनी दि.01/12/2025 रोजी निवेदन दिले आहे.

तरी, तक्रारदार यांनी ग्राम कवठा बहाळे येथे ग्रामरोजगार सेवक म्हणून केलेल्या कामाचे मानधन एकुन 1,62,500/- रु. चा सरपंच सौ.किरण मेश्राम यांची सही असलेला चेक आणून देण्यासाठी सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री. शशीकांत मेश्राम तसेच ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांनी शासकीय पदाचा प्रभाव टाकुन तडजोडीअंती अनुक्रमे श्री. शशीकांत मेश्राम यांनी 40,000/-रु. लाचेची मागणी व ग्रामसेवक कुरवाडे यांनी 30,000/-रु.



Scanned with OKEN Scanner

लाचेची मागणी करुन पैसे स्विकारण्यास सहमती दर्षविली. त्याचप्रमाणे लाच देण्यास प्रोत्साहन दिले तसेच विस्तार अधिकारी श्री.प्रल्हाद तेलंग व कॉन्ट्रक्टर श्री.चंदन नागमोते यांनी तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी कार्यवाही दरम्यान निश्पन्न झाले व दि.19/11/2025 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान सरपंच यांचे पती श्री. शशीकांत मेश्राम व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांना तक्रारदार यांचेवर षंका आल्याने त्यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नाही. तरी 1) श्री. शशीकांत मनोहरराव मेश्राम, वय-35 वर्ष, (सरपंच यांचे पती) रा.कवठा बहाळे ता. भातकुली जि.अमरावती ह.मु.पावर्ती नगर क्र.2, संत गजानन कॉलनी, अमरावती, 2) श्री.सुरेंद्र अजाबराव कुरवाडे, वय-40 वर्श, पद- ग्रामसेवक, ग्रामपंचायत-कवठा बहाळे रा.नायरा पेट्रोल पंपाजवळ कठोरा नाका अमरावती 3) श्री. प्रल्हाद नामदेवराव तेलंग, वय-53 वर्ष, पद-विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत अधिकारी भातकुली रा.जिजाउ कॉलनी,अर्जुन नगर अमरावती 4) कॉन्ट्रक्टर श्री.चंदन नागमोते रा.पावर्ती नगर न.1 अमरावती यांचे विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढून ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे. अशा फिर्यादीच्या फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Ramesh Laxmanrao Nimbhorkar
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 1021
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / Informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / Informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dilip shankarrao wa(
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**



Scanned with OKEN Scanner